लोकशाही वार्ता
# नागपूर
गुड मॉर्निंग
नागपूर, शुक्रवार, ५ जुलै २०२४/९
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### ३,८२३ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर :** दारूबंदी, जुगार, ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत २ तसेच, एनडीपीएस कायद्यान्वये एक अशा एकूण ३ प्रकरणांत ३ जणांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत ७८ हजार ०५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायद्यान्वये ४ प्रकरणांत ८ जणांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत ६ हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली ३ हजार ८२३ वाहन चालकांवर कारवाई केली. त्यांच्याकडून ३ लाख ४२ हजार १०० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

### विद्युत झटक्याने इलेक्ट्रिशियनचा मृत्यू

**नागपूर :** शहरातील बेलतरोडी पोलिस ठाणे हद्दीत इलेक्ट्रिकचे काम करताना विद्युत झटका लागल्याने एका इलेक्ट्रिशियनचा मृत्यू झाला. महेश इंदरसिंग सिरसाम (वय २२, रा. कोरजा, ता. परसवाडा, जि. बालाघाट, मध्यप्रदेश, ह.मु. प्लॉट नंबर १, न्यू मनीषनगर, बेलतरोडी) असे मृतकाचे नाव आहे. ३ जुलै रोजी महेश हा न्यू मनीषनगर येथील प्लॉट नंबर १४ व १५ येथे इलेक्ट्रिकचे काम करीत होता. यावेळी एक्सेन्शचे बटण बंद न करता त्याची वायर गोळा करीत होता. यावेळी त्याला विद्युत झटका बसल्याने तो बेशुद्ध झाला. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# कुलगुरू डॉ. चौधरी दुसऱ्यांदा निलंबित

## कुलपती तथा राज्यपाल बैस यांची कारवाई

**लोकशाही वार्ता / नागपूर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या चौकशीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिल्यानंतर महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी डॉ. चौधरी यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी राज्यपाल कार्यालयात बोलावले होते. परंतु डॉ. चौधरींनी लेखी उत्तर सादर करीत दोन दिवसांची वैद्यकीय रजा मागितली. त्यांच्या या उत्तराने समाधन न झाल्याने राज्यपालांनी गुरुवार, ४ जुलै रोजी डॉ. चौधरींना दुसऱ्यांदा निलंबित केले.

यापूर्वीही डॉ. सुभाष चौधरी यांना निलंबित करण्यात आले होते. मात्र,



त्यावेळी न्यायालयाने निलंबनाला स्थगिती दिल्यानंतर ते पुन्हा रुजू झाले. त्यानंतर पुन्हा राज्यपाल व कुलपती रमेश बैस यांनी डॉ. चौधरी यांच्याविरुद्ध चौकशीचे आदेश दिले होते. ही चौकशी पूर्ण झाली असून कुलपती यांनी चौधरी यांना स्पष्टीकरण देण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत नोटीस काढली. यानंतर डॉ. चौधरी यांनी चौकशी प्रक्रियेला आव्हान देणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली. न्यायालयाने या प्रकरणी चौधरी यांच्या चौकशीवर अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे राज्यपालांनी चौकशीसाठी बोलावले होते. चौधरी यांच्या लेखी उत्तराने समाधान न झाल्याने राज्यपाल कारवाई केली आहे. राज्यपालांनी चौधरींना राजीनामा देण्यास सांगितले होते. मात्र, त्यासाठी चौधरींनी नकार दिल्याने राज्यपालांनी गुरुवारी त्यांना निलंबित केले. डॉ. सुभाष चौधरी यांच्या विरोधातील असलेल्या अनेक तक्रारींविरोधात राज्यपालांनी चौकशी समिती लावली होती. या समितीच्या अहवालाच्या आधारे राज्यपालांनी कारवाई केली आहे. विशेष म्हणजे यापूर्वी राज्यपालांनी २१ फेब्रुवारी रोजी कुलगुरू डॉ चौधरींना निलंबित केले होते.

डॉ. सुभाष चौधरी हे अशाप्रकारे निलंबनाची नामुष्की ओढवणारे नागपूर विद्यापीठाचे पहिलेच कुलगुरू ठरले आहेत. त्यांच्याविरुद्ध असलेल्या तक्रारी लक्षात घेत राज्य सरकारने अजित बावीस्कर समिती नेमली होती. या समितीने चौकशीअंती विविध गैरव्यवहारप्रकरणी चौधरी यांच्यावर ताशेरे ओढले होते. त्यानुसार, चौधरी यांना पहिल्यांदा निलंबित करण्यात आले होते. मात्र, निलंबन करताना अपेक्षित असलेल्या कायदेशीर प्रक्रियेचे पालन न झाल्याचा ठपका ठेवत न्यायालयाने चौधरी यांच्या निलंबनाचा आदेश रद्द केला होता. त्यामुळे चौधरी यांनी यांनी ११ एप्रिलला पुन्हा कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला. नंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे यांच्या समितीकडून चौकशी सुरू करण्यात आली. या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर राज्यपालांनी चौधरी यांना स्पष्टीकरण देण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत नोटीस काढली होती.

# सुनील केदार यांच्या शिक्षेला स्थगितीस हायकोर्टाचा नकार

## एनडीसीसी प्रकरणात पाच वर्षांची झाली आहे शिक्षा

**लोकशाही वार्ता / नागपूर**

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (एनडीसीसी) रोखे घोटाळ्यामध्ये जिल्हा सत्र न्यायालयाने माजी आ. सुनील केदार यांना पाच वर्षांची शिक्षा ठोठावली असून, त्यांचे विधानसभा सदस्यत्वही रद्द केले आहे. या शिक्षेला स्थगिती देण्यासाठी केदारांनी उच्च न्यायालयात अर्ज केला होता. उच्च न्यायालयाने त्यांचा हा अर्ज फेटाळून लावला आहे. त्यामुळे आता त्यांना पुन्हा आमदारकी परत मिळविण्यासोबतच निवडणूक लढविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. न्या. उर्मिला जोशी-फाळके यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.



एनडीसीसी बँकेत वीस वर्षांपूर्वी झालेल्या १५० कोटी रुपयांच्या रोखे घोटाळ्यातील प्रमुख आरोपी व बँकेचे तत्कालीन अध्यक्ष सुनील केदार यांना नागपूर जिल्हा सत्र न्यायालयाने पाच वर्षांचा कारावास आणि साडेबारा लाख रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावलेली आहे.

यापूर्वी केदारांच्या जामीन आणि शिक्षेला सत्र न्यायालयाने स्थगिती नाकारल्यामुळे त्यांचा तुरुंगातील निवास वाढला होता. त्यानंतर केदार यांनी शिक्षेला स्थगिती देण्यासाठी उच्च न्यायालयात अर्ज केला. या प्रकरणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. एस. भोसले (पाटील) यांच्यासमक्ष सुनावणी झाली होती. आरोपीविरुद्ध सबळ आणि भक्कम पुरावा असल्याने स्थगिती देण्यात आली नसल्याचे सरकारी वकील नितीन तेलगोटे यांनी सांगितले होते. या प्रकरणात ॲड. अजय मिसार यांनी सरकारतर्फे बाजू मांडली. त्यांना नितीन तेलगोटे यांनी मदत केली.

सुनील केदार यांच्या वकिलांकडून एकाच केसमध्ये शिक्षेला स्थगिती आणि जामिनाची मागणी करण्यात आली होती. इतर पाच आरोपींना फक्त जामीन मिळावा यासाठी मागणी केली होती. तसेच दंडालासुद्धा स्थगिती मिळावी, अशी मागणी केली होती. केदार यांनी सत्र न्यायालयात जामीन फेटाळल्यास वेळेवर धावपळ होऊ नये म्हणून उच्च न्यायालयातही अपील केली होती. एकाचवेळी दोन्हीकडे केस लागली होती.

सरकारी वकील नितीन तेलगोटे यांनी केदार यांनी सत्र न्यायालयाला न कळविता उच्च न्यायालयात गेल्याबद्दल आक्षेप घेतला होता. उच्च न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर निकाल राखून ठेवण्यात आला होता.

# ना. गडकरी यांच्या मागणीनंतर आषाढीसाठी विशेष रेल्वे

## विदर्भातील भाविकांची होणार सोय : नागपूर, अमरावती, खामगावमधून सुटणार गाड्या

**लोकशाही वार्ता / नागपूर**

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या मागणीला तत्काळ प्रतिसाद देत रेल्वे मंत्रालयाने आषाढी एकादशीच्या यात्रेसाठी विदर्भातून विशेष गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पंढरपूरला जाणाऱ्या विदर्भातील लाखो भाविकांची मोठी सोय झाली आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील भाविक आषाढी एकादशीच्या यात्रेसाठी पंढरपूरला जातात. यामध्ये विदर्भातील नागपूरसह भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, अमरावती, अकोला, बुलडाणा येथील भाविकांचाही मोठ्या प्रमाणात समावेश असतो. यंदा बुधवार, १७



जुलैला आषाढी एकादशी आहे. त्यामुळे १२ जुलैनंतर पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांची संख्या जास्त असणार आहे. परंतु, पंढरपूरला जाणाऱ्या मोजक्या रेल्वेगाड्या असल्यामुळे अनेकांना विठ्ठलाच्या दर्शनाला मुकावे लागण्याची शक्यता होती. या मार्गावर विशेष रेल्वेगाड्या सुरू व्हायला हव्यात, अशी विदर्भातील भाविकांची मागणी होती. याचाच विचार करून गडकरी यांनी रेल्वे मंत्रालयाला पत्र लिहून विशेष गाड्या सुरू करण्याची मागणी केली.

'विदर्भातील भाविक मोठ्या प्रमाणात आषाढीच्या यात्रेसाठी पंढरपूरला जातात. भाविकांची संख्या बघता विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्याची आवश्यकता आहे,' असे गडकरी यांनी पत्रात नमूद केले होते. त्यानंतर अगदी काहीच दिवसांत यासंदर्भात निर्णय घेऊन रेल्वे मंत्रालयाने विशेष गाड्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विदर्भातील विठ्ठलभक्तांसाठी तातडीने विशेष गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल गडकरी यांनी रेल्वे मंत्रालयाचे आभार मानले आहेत.

### १४ जुलैपासून धावणार गाड्या

नागपूर, अमरावती व खामगाव अशा तीन ठिकाणांहून या गाड्या सुटणार आहेत. नागपूर येथून १४ व १५ जुलै, अमरावती येथून १३ व १६ जुलै तर खामगाव येथून १४ व १७ जुलैला या गाड्या सुटणार आहेत. या तिन्ही गाड्या विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमधून जाणार आहेत, हे महत्त्वाचे. याशिवाय १८ व १९ जुलैला मिरज ते नागपूर अशा परतीच्या मार्गावरील गाड्या धावणार आहेत.

### उपविभागीय दक्षता समितीसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**नागपूर :** नागपूर ग्रामीणसाठी उपविभागीय दक्षता समिती गठीत करण्यात आलेली असून उपविभागीय दक्षता समितीमध्ये पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त व्यक्तींची नेमणूक करावयाची आहे. यात वित्तीय व पतसंस्था यांचा एक प्रतिनिधी, उपविभागीय स्तरावरील जे अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये महत्वाची भूमिका बजावू शकतील असा एक प्रतिनिधी यांचा समावेश आहे. इच्छुक व्यक्तींनी सहायक आयुक्त, समाज कल्याण, विंग-बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रासमोर, श्रध्दानंदपेठ, नागपूर येथे ८ जुलैपर्यंत कार्यालयीन वेळेत प्रस्तावासहित प्रत्यक्ष संपर्क साधावा.

### दृष्टिक्षेप

### गांजा विक्रेत्याला अटक

**नागपूर :** विक्रीकरिता घरात ठेवलेला गांजा पोलिसांनी जप्त करीत आरोपीला अटक केली आहे. गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ४ च्या पथकाने ही कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, ३ जून रोजी संध्याकाळी ५.१५ वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ४ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलिंग करीत होते. यावेळी त्यांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी कळमना पोलिस ठाणे हद्दीतील प्लॉट नंबर १, देवीनगर, मोहतुरे यांच्या शेताजवळ राहणारा आरोपी प्रकाश माणिकराव पटले (वय २८) याच्या घरावर धाड टाकली. या कारवाईत त्याच्या घराची झडती घेतली असता घरातील एका पिशवीत १ किलो ७०० ग्रॅम गांजा दिसून आला. या गांजासह पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून एक मोबाईल, दुचाकी असा एकूण ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करीत त्याला अटक करण्यात आली आहे.

### अजनीत ३.४३ लाखांची घरफोडी

**नागपूर :** शहरातील अजनी पोलिस ठाणे हद्दीत झालेल्या घरफोडीच्या घटनेत चोरट्याने ३ लाख ४३ लाखांच्या मुद्देमालावर डल्ला मारला. चोरट्याने घराच्या दाराचे कुलूप तोडून आलमारीतून रोकड आणि दागिने लांबविले. या प्रकरणी प्राप्त तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, २ ते ३ जुलैदरम्यान, पहाटे ४ वाजताच्या सुमारास अजनी पोलिस ठाणे हद्दीतील प्लॉट नंबर १०/ए, भीमनगर, गल्ली नंबर १, बेले किराणा स्टोअर्सजवळ येथे राहणाऱ्या फिर्यादी रूक्मणी पासू शेख (वय ६८) या त्यांच्या घराला कुलूप लावून त्यांच्या बहिणीकडे संजय गांधीनगर येथे गेल्या होत्या. या दरम्यान, कुणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या दाराचे कुलूप तोडले आणि आत प्रवेश केला. घरातील बेडरूममधील लाकडी व लोखंडी आलमारीत ठेवलेली ६५ हजारांची रोकड तसेच सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी प्राप्त तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### सक्करदरा हद्दीत दीड लाखांची घरफोडी

**नागपूर :** घराला कुलूप लावून परिवारासह पुणे येथे गेलेल्या एका महिलेच्या घरी १ लाख ४१ हजारांची घरफोडी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सक्करदरा हद्दीतील सोमवारी क्वॉर्टर येथील रहिवासी सुनंदा हरिभाऊ अवचट (६२) या १८ जून रोजी त्यांच्या राहत्या घराला कुलूप लावून परिवारासह पुणे येथे गेल्या होत्या. २ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता त्या घरी परतल्या. तेव्हा त्यांना घरी चोरी झाल्याचे लक्षात आले. अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या मुख्य दाराचे कुलूप तोडून बेडरूममधील लोखंडी आलमारीत ठेवलेले रोख ३७ हजार रुपये व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ४१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. सक्करदरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# डेंग्यूचा डंख : महिन्याभरात जिल्ह्यात आढळले २८ रुग्ण

## प्रशासनाकडून जनजागृतीचा अभाव : एकाचा मृत्यू

**लोकशाही वार्ता / नागपूर**

वातावरणातील बदल व पावसाचे पाणी साचल्यामुळे त्यातून डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती वाढून त्यांचा प्रकोप वाढला आहे. त्यामुळे एकट्या जून महिन्यातच जिल्ह्यामध्ये डेंग्यूच्या २८ रुग्णांची नोंद झाली आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. रिकामे भूखंड, घरावरील टायर व इतर खाली वस्तूंमध्ये पाणी साचून डेंग्यूच्या अळ्या आढळण्याचे प्रमाण मोठे असतात. त्यावर जिल्हा आरोग्य विभागाकडून आरोग्य कर्मचारी, आशासेविका यांच्यामार्फत गृहभेट व प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम सुरू असल्याचे म्हणणे आहे. याशिवाय रांजण, मडके, कुलर, रिकाम्या जागेवर साचलेले पाणी, दूषित आढळलेल्या कंटेनरमध्ये टेमिफॉस्ट ही औषधी टाकण्यात येत आहे. तसेच आठवड्यातून एकदा कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य यंत्रणेने केले आहे. परंतु रिकाम्या प्लॉटवर किंवा घराच्या परिसरात पाणी साचल्यामुळे त्यात डासांची उत्पत्ती होऊन प्रकोप वाढत असतो, हे दरवर्षीच दिसून आले आहे. अशा परिस्थितीत या डासांच्या उत्पत्तीला रोखण्यासाठी व नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जाणीवजागृती क रण्यासाठी प्रशासकीयस्तरावर पाहिजे त्याप्रमाणात काम होताना दिसून येत नाही. त्यामुळेच डेंग्यूच्या डासांचा प्रकोप वाढण्यासोबतच त्याच्या रुग्णसंख्येतही वाढत होताना दिसून येत आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये जून महिन्यात डेंग्यूचे जिल्ह्यात २८ रुग्ण आढळले आहेत. सहा महिन्यांतील हा आकडा ५५ रुग्णांचा आहे. डेंग्यूच्या आजारामुळे गत महिन्यात मौदा तालुक्यात एकाचा मृत्यू झाला होता.

दुसरीकडे पावसामुळे पिण्याच्या पाण्यातून नवे क्षार येतात. पाण्याचे शुद्धीकरण न झाल्यास ते पाणी नागरिकांना पिण्यात जाऊन साथरोगाची शक्यता असते. जून महिन्यात कळमेश्वर तालुक्यातील सेलू येथे ही स्थिती उद्भवली होती. जुलै महिन्यात ही स्थिती निरंक आहे. मलेरिया आणि चिकन गुनियाची रुग्णसंख्या नाही, ही चांगली बाब असली तरी आरोग्य विभागाने अलर्ट राहणे गरजेचे झाले आहे.

### मुलाने केली वडिलांची हत्या



**वार्ताहर/ खापरखेडा**

मुलाने वडिलांची हत्या केल्याची घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. सावनेर तहसील हद्दीतील खापरखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील इसापूर गावात बुधवारी पहाटे २ वाजता ही हृदयद्रावक घटना घडली. भोजराज महल्ले (६५) असे मृताचे नाव असून पांडुरंग महाल्ले असे आरोपीचे नाव आहे. आरोपी बुधवारी आई लीलाबाईसह कोकर्डा गावातील मामाच्या घरी गेला होता.

आईला मामाच्या घरी सोडल्यानंतर तो इसापूर येथील आपल्या घरी आला. घरात वडिलांसोबत पैशावरून वाद झाला. वडिलांच्या गळ्यावर कुऱ्हाडीने वार करून खून केला पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून पुंडलिकला ताब्यात घेतले. आरोपी पुंडलिक हा मानसिक आजारी असल्याचे भावाने फिर्यादीत म्हटले आहे.



२३ सप्टेंबर २०२३ च्या मध्यरात्री नागपूरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अंबाझरी तलाव 'ओव्हरफ्लो' झाला व परिसरातील वस्त्या अक्षरशः पाण्यात बुडाल्या होत्या. न्यायालयाने कान टोचल्यावर खडबडून जागे झालेल्या शासनाने तलाव बळकटीकरणाचे काम हाती घेतले आहे. येथील जुना पूल तोडून नव्याने त्याचे बांधकाम सुरू आहे. (लोकशाही वार्ता छायाचित्रसेवा)

# फॅक्ट्रीतील स्फोटात मालकाचा हलगर्जीपणा उघडकीस

## सहा महिन्यांनी गुन्हा दाखल : दोन कामगारांचा झाला होता मृत्यू

**लोकशाही वार्ता/नागपूर**

उप्पलवाडी येथील बालाजी आईस फॅक्ट्री झालेल्या स्फोटात मालकाचा हलगर्जीपणा उघडकीस आला आहे. त्यामुळे आता या प्रकरणी घटनेच्या सहा महिन्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय जुगलकिशोर शाहूची (वय ६२, रा. सदर) असे या आरोपी मालकाचे नाव आहे. जानेवारी महिन्यात या फॅक्ट्रीत स्फोट झाला होता. यात दोन कामगारांचा मृत्यू झाला होता.

बालाजी आईस फॅक्ट्रीमध्ये ६ जानेवारीला अमोनिया गॅसचे प्रमाण वाढल्यामुळे स्फोट झाला होता. स्फोटानंतर परिसरात देखील वायूची गळती सुरू झाल्याने अनेकांना त्रास झाला होता. स्फोटात जखमी झालेल्या डुग्गरसिंग रावत (७०, राजस्थान) व खुम्मनसिंग लुम्बसिंग (४५, राजस्थान) या कामगारांचा ६ व १० जानेवारी रोजी मृत्यू झाला होता. तर श्रावणसिंग बघेल (४४, यशोधरानगर) व राजा राजेंद्र आर्य (वय २३, रा. चिचोली, मध्यप्रदेश) हे कामगार जखमी झाले होते. कपिलनगर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. यानंतर करण्यात आलेल्या तपासात या फॅक्ट्रीमध्ये अमोनिया गॅसवर नियंत्रण ठेवण्याची सक्षम यंत्रणाच नसल्याची बाब पुढे आल्यानंतर मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुचाकीच्या धडकेत पादचारी जखमी

**नागपूर :** पायदळ रस्ता ओलांडणाऱ्या एका पादचाऱ्याला भरधाव दुचाकीने धडक दिली. नंदनवन हद्दीतील ईश्वरनगर येथे राहणारे सतीश दिलीप धांगरे (३३) हे ३० जून रोजी दुपारी ४.५० वाजताच्या सुमारास प्रतापनगर हद्दीत श्री. जी. हाऊस, एस बँकेच्या समोर, खामला रिंग रोडवरून पायदळ रस्ता ओलांडत होते. यावेळी एका एम.एच. ३१/ एफ. वाय. ९१७५ क्रमांकाच्या मोपेडच्या चालकाने त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून धडक दिली आणि पळून गेला. या प्रकरणी धांदरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून प्रतापनगर पोलिसांनी मोपेड चालक आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

# प्रशासन भंडाऱ्याच्या घटनेच्या पुनरावृत्तीची प्रतीक्षा करते काय?

## नागपुरातही जि.प.च्या शाळांमध्ये विद्युत व्यवस्थेची दैनावस्था : प्रशासनाचे दुर्लक्ष, कधी माहितीदेखील मागविली नाही

**लोकशाही वार्ता / नागपूर**

भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये स्वच्छतागृहात पडून असलेल्या इलेक्ट्रिक वायरचा करंट बसून एका सहा वर्षीय चिमुकलीला प्राणापासून मुकावे लागले. भंडाऱ्याप्रमाणेच नागपूर व राज्यातील इतरही जिल्ह्यांमधील जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्युत व्यवस्थेची प्रचंड दैनावस्था आहे. परंतु याबाबत कधीही ना शासनाने आणि ना कधी स्थानिक प्राधिकरण असलेल्या जि.प.ने माहिती मागविण्याची तसदी घेतली नाही. नागपूर जि.प.चा विचार केल्यास येथे सत्ताधाऱ्यांना केवळ



आपले 'अर्थकारण' जिथे साधते त्याच गोष्टींच्या खरेदी किंवा बांधकामाचा आग्रह असतो. परंतु विद्युत व्यवस्थेसारख्या गंभीर बाबीकडे सेस फंडातून कधीही छदमादेखील तरतूद केल्याचे आठवत नाही.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये जि.प.च्या १५१२ शाळा असून, या गरिबांच्या शाळा म्हणून ओळखल्या जाते. येथे सुमारे सत्तर हजारांवर विद्यार्थी शिक्षण घेतात. सातत्याने या शाळांना विविध योजना व निधीच्या माध्यमातून शासनाकडून विकास साधण्याचा प्रयत्न होत असतो. जि.प.च्या माध्यमातूनही निव्वळ साहित्यांची खरेदी करून या शाळांच्या माथी मारण्याचा प्रयत्न आजवर होत असते. आजही जिल्ह्यामध्ये शेकडो शाळा दोन-चार दशकांपूर्वीच्या आहेत.

आज तिथे इमारतीची अवस्था तर बिकट झालीच आहे. याशिवाय इलेक्ट्रिक वायरिंगही धोकादायक झाली आहे. अशा परिस्थितीत त्या शाळांमध्ये सेस फंडाच्या निधीतून विद्युत व्यवस्था सुधारण्याची नितांत गरज आहे. परंतु याऐवजी पदाधिकारी व प्रशासन हे विविध साहित्याच्या माध्यमातून त्या शाळांचा विकासाच्या माध्यमातून आपला विकास साधण्यातच धन्यता मानत आहे.

त्यामुळे भविष्यात नागपूर जिल्ह्यातही जि.प.च्या शाळांमध्ये भंडारा जिल्ह्यातील शाळेमध्ये घडलेली दुर्दैवी घटना घडण्याची प्रतीक्षा प्रशासन व पदाधिकारी करीत आहेत का? असा सवाल संतप्त पालकांकडून उपस्थित होत आहे. तेच शाळांच्या डागडुजीच्या नावावर दरवर्षी कोट्यवधींच्या निधीची तरतूद करण्यात येते. परंतु वर्षाअखेर यातील बहुतांशी निधी इतर हेडवर वळता करण्यात येत असल्याचे सांगण्यात येते.

जि.प.कडून सेस फंडातून अनावश्यक विविध बाबींवर खर्च होत असतो. ज्यामध्ये विविध समित्यांचे राज्याअंतर्गत राज्याबाहेरील दौऱ्यांवर लाखोंची उधळपट्टी होते. परंतु हे दौरे जिल्ह्याच्या विकासाच्यादृष्टीने कुठेही फायदेशीर ठरल्याचे आजवर दिसून आले नाही. अशा अनावश्यक ठिकाणी खर्चाऐवजी तोच निधी या जि.प.शाळांतील विद्युत व्यवस्थेच्या मेंटेनन्स किंवा सुधारणेच्या कामी लावल्यास भविष्यात भंडाऱ्यासारखी घटना जिल्ह्यात रोखता येऊ शकते.

जि.प.तील सूत्रांच्या माहितीनुसार जिल्ह्यामध्ये सुमारे दीडशेवर अशा शाळा आहेत ज्या मोडकडीस आल्या आहेत. त्या कधी जमीनदोस्त होईल याची काही शाश्वती नाही. तिथे भिंतींना भेगा पडल्या असून, छतातुनही गळती होत आहे. याशिवाय याच गळती होत असलेल्या भिंतीवर जुन्या काळातील इलेक्ट्रिक वायरिंग आहे. त्यांचीदेखील प्रचंड दैनावस्था आहे. अनेक ठिकाणी त्या लटकलेल्या अवस्थेत पहायला मिळत आहे.

# बेला येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर

## नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण



**वार्ताहर/ बेला**

बेला उमरेड तालुक्यातील सर्वात मोठे गाव, वीस हजारांच्या वर लोकसंख्या आणि प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा असलेल्या बेला येथील रुग्णालयाला तीस खाटांच्या श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयास मान्यता मिळाली. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

बेला या गावाशी आजूबाजूचे ५० ते ७० गाव दररोज संपर्कात असून, आरोग्याच्या सेवेसाठी शासकीय दवाखाना म्हणून बेला येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकडे सगळ्यांची धाव असते. साथीचे रोग असो की किरकोळ आजार यावर उपाययोजना करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र बेला सदैव तत्पर असते. परंतु, अनेक गंभीर आजार किंवा अपघातासारखे गंभीर प्रश्न या दवाखान्यात हाताळू शकत नसल्याने रुग्णांना तातडीने नागपूरच्या शासकीय रुग्णालयात हलविण्यात येत होते. पुरेशा खाटा नसल्याने रुग्णांना येथे औषध उपचार घेताना ॲडमिट करता येत नव्हते, अशा जीवनावश्यक सेवेकरिता आपण काहीतरी करावे म्हणून बेला ग्रामपंचायतचे सरपंच आणि जि. प. सदस्यांनी मिळून बेल्याला उपजिल्हा रुग्णालय कसे आणता येईल. याकरिता अथक प्रयत्न आणि आणि जि.प. निडणुकीत त्यांनी लोकांना आश्वासन दिले होते ते पूर्णत्वास केले. तसेच त्यांच्यासोबत इतर नेत्यांनीसुद्धा बेला येथे हे रुग्णालय यावे म्हणून पंचायत समिती सदस्य, आमदार तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी याकरिता प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नांना यश आले.

ग्रामीण रुग्णालय मंजूर व्हावे, याकरिता नागपूर डीडी ऑफिसमधून डॉ. प्रमोद गवई व डॉ. कविता वंजारी यांनी विशेष सहकार्य केले. या रुग्णालयाकरिता प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या लोकप्रतिनिधी सामाजिक कार्यकर्ता सहकार्य सहकार्य करून यांच्या प्रयत्नांना यश आले.

– **पुष्कळ डांगरे**, पंचायत समिती सदस्य व गटनेता

बेला प्रा.आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून ग्रामीण रुग्णालय बनविण्याकरिता सरपंच या नात्याने आत्मीयेतून धडपड करून, बेला प्राथमिक आरोग्य केंद्राला ५० ते ७० गावांतील व परिसरातील रुग्णांना सेवा मिळावी यासाठी जि.प. सदस्य वंदना बालपांडे यांनी मानस केला की, आपण बेला प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून ग्रामीण रुग्णालयाला आणण्यात यश आले.

– **अरुण बालपांडे**, सरपंच, ग्रामपंचायत बेला

बेल्यापासून तर मुंबईपर्यंतचा रुग्णालयाच्या संदर्भातील कागदांचा प्रवास, बेल्याकरिता जिव्हाळा लावणाऱ्या प्रत्येक नेत्याने, सरपंच, जि.प. सदस्य, पं.स. सदस्य माजी आमदार, समाजकार्य करणाऱ्या सामाजिक दूत व बेल्यातील जागृत नागरिकांनी केल्यामुळे बेल्याला तीस खाटा श्रेणी दर्जाचे उपजिल्हा रुग्णालय मिळाल्याने पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण आहे. त्यामुळे रुग्णांना पाहिजे त्या सुविधा, सेवा, बेला येथे उपलब्ध होणार असून एम्सची ओपीडीसुद्धा येथे सुरू झाली असल्याने रुग्णांना याचा फायदा होईल. तसेच ग्रामीण रुग्णालय बेला येथे आल्याने त्याचे श्रेय लाटण्याचे केविलवाना प्रयत्न करताना दिसत आहे. परंतु बेल्याच्या शिरोपेचात ग्रामीण रुग्णालयाने मानाचा तुरा रोवला गेल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## दृष्टिक्षेप

### विद्यार्थी, डॉक्टर व शेतकऱ्यांचा सत्कार



**वार्ताहर/कन्हान**

जय शीतला माता मंदिर कांद्री कन्हानद्वारे जागतिक डॉक्टर दिवस व कृषिदिनामित्त १० व १२ वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व डॉक्टर, शेतकरी बांधवांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात संजय चौकसे, किशोर वासाडे, कांद्री ग्रामपंचायत माजी सदस्य चंद्रशेखर बावनकुळे, माजी सदस्य लता बावनकुळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवकुमार होले , उत्कृष्ट राहाटे, आदित्य वासाडे, रिया चव्हाण, स्नेहा कनसागरा, राम विश्वकर्मा, गुनगून चव्हान, खुशी टेंभुर्णे, नैना तिवारी, दिपेश पडोळे या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. तसेच डॉ.भाविका महेश मंगतानी व शेतकरी वसंता नारायण राऊत , बादल रामचंद्र विश्वकर्मा यांचाही वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. यशस्वीतेसाठी वामन देशमुख,अशोक खैरकर, प्रकाश ढोके, ओमदास लाडे, महेश मंगतानी, राजेश पोटभरे, विनायक कारेमोरे, गणेश शाहू आदींनी परिश्रम घेतले.

### शिवणकाम प्रशिक्षण समारोप कार्यक्रम उत्साहात

**वार्ताहर/खापरखेडा**

महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामपंचायत चिंचोलीच्या वतीने खापरखेडा परिसरातील पंचशील भवन येथे ४५ दिवसीय शिवणकाम प्रशिक्षण समारोप कार्यक्रम नुकताच पार पडला. कार्यक्रमाच्या अधक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा मुक्तत कोकडे होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून सावनेर पंचायत समितीचे प्रभारी सभापती राहुल तिवारी,पं.सं.च्या माजी सभापती अरुणा शिंदे, मनोज हिरूडकर, जि.पं सदस्य निलिमा उईके, चिचोली ग्राम पंचायतीच्या सरपंचा मीनाक्षी तागडे, ग्रामपंचायत सदस्या निकिता रामटेके,मोनिका घाटबांधे,सारिका धनविजय,शिवणकला प्रशिक्षिका मिरा पाटील, मंजू श्रीवास्तव आदी उपस्थित होत्या. यावेळी प्रशिक्षण कालावधित ज्या मुली व महिलांना प्रशिक्षण घेतले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणात देण्यात आले. परिसरातील महिलांना शिकण्याकरिता जेष्ठ सामाजिक महिला कार्यकर्त्या प्रभा तागडे यांनी मोफत सभागृह उपलब्ध करून मोलाचे सहकार्य केले. यात खापरखेड्यातील २६० मुली व महिलांनी शिवणकाम प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला होता.


### स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे ‘रौप्य महोत्सव’



**लोकशाही वार्ता/वानाडोंगरी**

येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळेचा रौप्य महोत्सव कार्यक्रम संस्थेच्या सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला रौप्य महोत्सवी प्रतिक चिन्हाचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या वरिष्ठ प्राचार्या कविता नागराजन होत्या. तर प्रमुख अतिथी जेष्ठ बालरोग तज्ज्ञ डॉ. सतीश देवपुजारी, मेघे शाळा समूहाच्या मुख्याधिकारी आभा मेघे, संचालक अजिंक्य अंबरखाने उपस्थित होते. यावेळी शाळेच्या प्राचार्या कविता नागराजन यांनी शाळेने गेल्या २५ वर्षात शाळेने शिक्षण, क्रीडा, संगीत, नृत्य आणि सध्याच्या नावीन्यपूर्ण विभागात शाळेने केलेल्या प्रगतीची माहिती दिली. त्यानंतर संगीत विभागातर्फे २५ वर्षांच्या प्रवास मांडणारे थीम गीत सादर करण्यात आले.

### जिल्हा परिषदेकडून तालुक्यातील शिक्षकांचा सन्मान



**लोकशाही वार्ता/ वानाडोंगरी**

विनोबा टीमकडून मागील शैक्षणिक सत्रात शाळेत गुणवंत्ता पूर्ण शालेय उपक्रम राबविणाऱ्या वडगाव गुजर येथील शिक्षक अवधेश तिवारी यांचा जिल्हा परिषदकडून लॅपटॉप भेट देत सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या सभागृहात मुख्य कार्यपालन अधिकारी सौम्या शर्मा, शिक्षणाधिकारी काळूसे, शिक्षण विस्तार अधिकारी विजय कोकुडे, डायट येथील प्राचार्य बुराडे यांच्या हस्ते गुमगाव केंद्रातील शिक्षिका हर्षा मोडक, शुभांगिनी वालदे, सरिता वागदे यांना पोस्ट ऑफ मंथ बक्षीस देण्यात आले. याप्रसंगी गुमगांव विभागाचे केंद्रप्रमुख भूपेश चव्हाण, विनोबा टीमचे विशाल डहाट यांच्यासह अधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

# स्पर्धेच्या युगात उत्तम यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनो कठोर परिश्रम करा - बावनकुळे



**तालुका वार्ताहर/ कामठी**

या स्पर्धेच्या युगात उत्तम यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेण्याचे आव्हान प्रदेश भाजप अध्यक्ष व विधान परिषद सदस्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी भारतीय जनता पार्टी येरखेडाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

झेंडा चौक येथे आयोजित कार्यक्रमात आ. टेकचंद सावरकर,नागपूर जिल्हा भाजप महामंत्री अनिल निधान, जिल्हा परिषद सदस्य उमेश माकडे,माजी सभापती उमेश रडके, माजी सभापती वसंतराव काळे, माजी उपसभापती देवेंद्र गवते, ॲड. आशिष वंजारी,लतेश्वरी काळे,ब्रह्मानंद काळे,धनंजय इंगोले, माजी सरपंच मंगला कारेमोरे, मनीष कारेमोरे, राजकिरण बर्वे, उपसरपंच मंदा महल्ले पाटील, गजानन तिरपुडे, ग्रामपंचायत सदस्य आचल तिरपुडे, अनिल भोयर, कुलदीप पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थी आदिती बोपचे, भाविनी चौरे, गुंजन भस्मे, आर्या गबने, अथर्व कांबळी, प्रथमेश भुजाडे, रिषभ खानवाणी, रेणुका बावनकर, जानवी मोरे, आकांक्षा सावरकर, चेतना खंडाळकर, माला फायदे, निशांत बोरकर, खुशी समरित, प्रियंका सावरकर, भूमिका सोनेकर, उपल गवते, पूजा गभणे यांना स्मृतीचे चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. संचालन राजेंद्र चौरे तर आभार प्रदर्शन गजानन तिरपुडे यांनी मांडले.

# तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत जनप्रभा महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रथम



**शहर वार्ताहर/रामटेक**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग महाराष्ट्र शासनाची स्वायम संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी पुणे अंतर्गत समतादूत प्रकल्प तालुका रामटेक व परिवर्तन मंच, रामटेक यांच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५० व्या जयंतीच्यानिमित्ताने तालुकास्तरीय प्रश्न मंजुषा स्पर्धेत जनप्रभा महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रथम क्रमांक पटकविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नरेंद्र तिडके महाविद्यालय, रामटेकचे प्राचार्य डॉ. मनोज तेलरांधे होते. याप्रसंगी नागपूर जिल्हा प्रकल्प अधिकारी हृदय गोडबोले प्रमुख्याने उपस्थित होते. या प्रश्न मंजुषा कार्यक्रमात लोकराजा गटात जनप्रभा महाविद्यालय, रामटेक येथील हर्षिता येऊतकर, कुंती वाट व आस्था शंग्रपवार तर राजर्षी गटात श्री नरेन्द्र तिडके कनिष्ठ महाविद्यालय रामटेक येथील राखी संभलवार, जयेश खेवले व आचल बलगेवार या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तर छत्रपती गटात श्रीराम कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथील नयना हटवार,ॠतुजा हरखंडे,व हेतल कावळे यांनी सहभाग घेतला. अनुक्रमे लोकराजा गटाने प्रथम, राजर्षी गटाने द्वितीय तर छत्रपती गटाने तृतीय क्रमांक पटकावला. परिक्षण परिवर्तन मंच रामटेकचे कार्याध्यक्ष राहुल जोहरे व मौदा तालुका समतादूत दुर्योधन बगमारे यांनी केले. तर आभार प्रा.सुनील कठाणे यांनी मानले.

# रामटेक येथे ‘एसआयएस’तर्फे ‘डॉक्टर डे’ उत्साहात



**शहर वार्ताहर/ रामटेक**

येथील साई इंटरनॅशनल स्कूलतर्फे ‘डॉक्टर डे’ निमित्त बंगालचे माजी मुख्यमंत्री महान चिकित्सक डॉ. बिधान चंद्र यांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी वैद्य डॉ.बिधानचंद्र यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले विचार माडले. याप्रसंगी शाळेचे संचालक डॉ. विठ्ठल नागपुरे उपस्थित होते.

# महादुल्यात पुरेसा पाणीपुरवठा करा

## काँग्रेस पक्षाची मागणी



**वार्ताहर/ कोराडी**

गेल्या काही माहिन्यांपासून महादुला येथे काही भागात नियमित पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे नियमित पाणीपुरवठा करण्यात यावी, या मागणीसाठी काँग्रेस पक्षाचे रत्नदीप रंगारी यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या महादुला येथील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. याप्रसंगी शिष्टमंडळाच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कनिष्ठ कार्यकारी अभियंता निशिकांत ठोंबरे व नगरपंचायतचे पाणीपुरवठा विभागाचे अभियंता हर्षल पवार यांना मागणीचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात मागील काही महिन्यांपासून महादुला येथील मागासलेल्या भागात नियमित पाणीपुरवठा होत नाही. त्याचप्रमाणे प्राधिकरणतर्फे दूषित पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. या दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. यासह विविध मागण्यांसाठी काँग्रेस पक्षातर्फे करण्यात आला. याप्रसंगी संजय रामटेके, शरद मेश्राम, राजू गजघाटे, विजय सोनवणे, सोनू गजभार, गणेश लाडे, मोंटू कुथे, विकास लझडे, आशिष जरवार, प्रदीप खोब्रागडे, आकाश शेंडे, चंद्रकांत गडपायले, प्रवीण उगले, कुलदीप सहारे, सूर्यकांत गडपायले, शंकर छत्री आदी उपस्थित होते.

### बिडगाव परिसरातील नागरिकांना आरोग्य सुविधा मिळणार - प्रा. लेकुरवाळे

**तालुक वार्ताहर/ कामठी**

तरोडी (बु) बिडगाव परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात आरोग्य सुविधा मिळणार असल्याचे मत नागपूर जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण सभापती प्राचार्य अवंतिका लेकुरवाळे यांनी तरोडी (बु) येथे आरोग्य उपकेंद्र इमारत बांधकामासाठी राज्य शासना कडून एक कोटी ३४ लाख रुपयांचा निधी मंजूर बांधकामाचे भूमिपूजन प्रसंगी मार्गदर्शन करताना व्यक्त केले. याप्रसंगी उपसभापती दिलीप वंजारी, माजी उपसभापती आशिष मलेवार, सरपंच आरती चिकटे,उपसरपंच रमेश डेरे, ग्रामपंचायत सदस्य धर्मेंद्र कडू आदी उपस्थित होते.

# आम आदमी पार्टीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**वार्ताहर/ खापा**

तालुक्यातील आम आदमी पार्टीच्या वतीने दहावी व बारावीतील परीक्षेत चांगल्या प्रकारे गुण मिळालेल्या ४२ विद्यार्थ्यांचा सत्कार कामाक्षी सेलिब्रेशन हॉल येथे करण्यात आला. यावेळी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अधक्षस्थानी खासदार श्याम कुमार बर्वे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार सुनील बाबू केदार, आम आदमी पार्टीचे वानखडे, कामाश्री सेलिब्रेशनचे व्यवस्थापक पंकज घाटोळे आदी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सत्कार करण्यात आले. यावेळी कामाश्री सेलिब्रेशनचे व्यवस्थापक पंकज घाटोळे यांनी विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शनात सांगितले की, आजच्या काळात शिक्षणाला भरपूर महत्त्व तर आहेत. परंतु, शिक्षणामुळे बहुतेक मुले आपला छंद आपला फॅशन हा बाजूला ठेऊन डिजिटल वर्ल्डमध्ये गुंजलेला आहे. आपल्या लाईफमध्ये आपला छंद आपले फॅशन किती महत्त्वाचे आहे. तसेच तंत्रज्ञानाचा उपयोग आपण किती चांगल्या प्रकारे करू शकतो व आपली लाईफ किती आनंदाने जगू शकतो याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन संजय राऊत यांनी मानले.

### उच्च प्राथमिक शाळा माहुली येथे गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत



**शहर वार्ताहर/ रामटेक**

१ जुलै रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा माहुली पंचायत समिती पारशिवणी येथे मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांचा प्रवेश उत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवामध्ये शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर डडमवार, मनोज चटप, ग्रामपंचायत सदस्य अर्चना घरत, सामाजिक कार्यकर्ते टेकचंद कुसुंबे, श्रीराम प्रसाद पहाडे, मुख्याध्यापक माला सरोते आदींनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

# विद्यार्थ्यांची एसटी पास आता थेट शाळेतून

## लाखोटिया भुतडा महाविद्यालयात पास वितरणाला प्रारंभ



**वार्ताहर/ कोंढाळी**

येथील साखोटिया भुतडा हायस्कूल व कनिष्ठ विद्यालयामध्ये पुण्यश्लोक महिल्याबाई होळकर मानव विकास कार्यक्रमामध्ये मुलींना निःशुल्क पाससेवा तर मुलांना ६६ टक्के रक्कम योजनेत एसटी प्रशासनातर्फे एसटी पास आपल्या शाळेत या मोहिमेअंतर्गत विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना पास वाटपाचा शुभारंभ बुधवारी (दि. ३ ) करण्यात आला.

याप्रसंगी राज्य परिवहन महामंडळाचे काटोलचे आगार व्यवस्थापक अनंत तारक वाहतूक निरीक्षक साहेबखान पठाण, कोंढाळी वाहतूक नियंत्रक एकनाथ चोद्रे यांच्या उपस्थित विद्यार्थ्यांना पासवाटप करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुधीर बुटे, ज्येष्ठ पत्रकार दुर्गाप्रसाद पांडे, उपप्राचार्य कैलास पुल, वरिष्ठ शिक्षक राजेंद्र खामकर , वरिष्ठ पर्यवेक्षक मनोज डाले हरिष राठी आदी उपस्थित होते.

नवीन वर्षांच्या पहिल्या सत्रातील शाळा सुरू झाल्या आहेत. बाहेरगावाच्या मुलांना घरापासून शाळेपर्यंत जन्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६ टक्के सवलत दिली आहे. केवळ ३३ टक्के रक्कम भरुन विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येईल. आज विद्यालयात शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर व ६६ टक्के सवलत विद्यार्थी पास योजनेंतर्गत पाचवी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण करण्यात आले. यापूर्वी विद्यार्थी, विद्यार्थिनींना एसटी पाससाठी कोंढाळी बसस्थानकावर जाऊन लाईनमधे उभे राहून पास घ्यावी लागत होती. शाळा सुरू झाल्याने शाळांमध्ये शिक्षकांकडून अभ्यासक्रम घेतला जातो. त्यामुळे पाससाठी सुटी घ्यावी लागते . तसेच आगारात किंवा वाहतूक नियंत्रण केंद्रावर जाऊन आगार व्यवस्थापक / वाहतूक नियंत्रकांकडून पास घेतले जात होते. या शैक्षणिक वषार्पासून विद्यार्थ्यांना पाससाठी रगत ताटकळत उभे रहावे लागणार नाही. विद्यार्थिनीना एसटी पास शाळेत उपलब्ध केले जाणार आहेत. या संदर्भात ३ जुलैपासून एस . टी . प्रशासनातर्फे एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम सुरू झाली आहे .

### प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन

सध्या काटोल आगारासह सर्वच आगारात वाहतूक नियंत्रकांचे मनुष्यबळ कमी आहे व काटोल, नरखेड तालुक्यात शैक्षणिक शाळांची संख्या भरपूर आहे. आता कोंढाळी तसेच अन्य ट्राफिक कंट्रोलर कक्षाचे वाहतूक नियंत्रकाला आपले दैनिक कार्यवाहीसोबत विद्यार्थी पासेसचे तेही प्रत्येक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना वाटप करावे लागणार आहे. अशाप्रसंगी मनुष्यबळाअभावी एसटी महामंडळाच्या शाळेतच पास योजना फलदायी ठरणार काय? काटोल आगाराचे आगार व्यवस्थापक अनंत तातर यांना विचारले असता त्यांनी सांगितले की एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसारच शाळेत जाऊन पास वितरण काम सुरु आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी व शाळा प्रशासनानेही सहकार्य करावे, असे आवाहन एसटीचे आगार व्यवस्थापक अनंत तातर यांनी केले आहे .

# लाडकी बहीण योजनेसाठी दाखले ग्रा.पं. मधून मिळावे

## राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची मागणी



**तालुका वार्ताहर/काटोल**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत लागणारे सर्व दस्तावेज (जन्म प्रमाणपत्र) ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करून देण्यात यावी, या मागणीचे निवदेन राष्ट्रवादी महिला काँग्रेस शरदचंद्र पवार नागपूर ग्रामीणच्या डॉ.वैशाली टालाटुले यांनी उपविभागीय अधिकारी तसेच गटविकास अधिकारी पं.स. काटोल यांना दिले. या योजनेअंतर्गत जो जन्माचा दाखला आवश्यक आहे. हा पंचायत समिती कार्यालयात जमा केलेला आहे. त्यामुळे सन १९९० च्या आधी जन्म झालेल्या महिलांना पंचायत समिती कार्यालयातून जन्मदाखला घ्यावा लागत आहे. अशी निवेदनाद्वारे विनंती करण्यात आली आहे. पंचायत समितीला असलेला जन्म रेकॉर्ड ग्रामपंचायत कार्यालयास काही दिवसांसाठी उपलब्ध करून द्यावा. ज्यामुळे महिलांना वेळेच्या आत ग्रामपंचयात कार्यालयातून जन्म दाखला मिळेल. त्यामुळे काटोल व नरखेड तालुक्यातील सर्व पात्र महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येईल. याप्रसंगी पंचायत समितीचे उपसभापती निशिकांत नागमोते, चेतन भुयार, अनवाने, वैशाली तरटे, प्रीती डिवरे, विद्या टालाटुले तसेच सरपंच ग्रामपंचायत सदस्य इतर महिला नागरिक उपस्थित होते.

### पुरवणी परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध

**नागपूर :** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. या संदर्भात तांत्रिक अडचणी उद्भवल्यास माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी सचिव शैलेंद्र पाटील यांनी कळविले आहे. सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना जुलै-ऑगस्ट २०२४ च्या १०वी, १२वी परिक्षेची प्रवेशपत्रे www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर ४ जुलै २०२४ पासून उपलब्ध करून देण्यात आले आहे. स्कूल/कॉलेज लॉगिंगमध्ये डाऊनलोड करण्याकरिता ही प्रवेशपत्र उपलब्ध झाली आहे.

### दृष्टिक्षेप

## मागासवर्गीय शासकीय निवासी शाळांमध्ये प्रवेशाची प्रक्रिया सुरू

**लोकशाही वार्ता / नागपूर**

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाद्वारे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या शासकीय निवासी शाळा सुरू करण्यात आलेली असून सामाजिक न्याय विभागांतर्गत नागपूर जिल्ह्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, वारेगाव ता. कामठी, जि. नागपूर येथे एक व अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासीशाळा, वानाडोंगरी, जि. नागपूर येथे एक अशा दोन शासकीय निवासी शाळा इयत्ता ६ वी ते १० वीपर्यंत कार्यरत असून सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात सदर निवासीशाळेत मोफत प्रवेश देणे सुरू आहे.

सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यान्वित जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलां/मुलींच्या शासकीय निवासीशाळेत अध्यापनासाठी प्रशिक्षित व अनुभवी शिक्षक वर्ग, मोफत शिक्षण साहित्य, शालेय गणवेश, क्रीडा ट्रॅक सूट, सर्व शैक्षणिक साहित्य पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, पौष्टीक जेवण, नाश्ता, दूध, अंडी, फळे, अंथरुण, पांघरुण, आंघोळीकरिता गरम पाण्याची व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. सुरक्षा, डिजिटल क्लास रूम, ग्रंथालय, प्रयोग साहित्यांनी सुसज्ज प्रयोगशाळा, शाळेसाठी भव्य क्रीडांगणसहीत क्रीडा साहित्य व ग्रीन जिम, सुसज्ज संगणक कक्ष, सुसज्ज सायन्स लॅब, सुसज्ज मॅथ लॅब, भाषा लॅब, विविध वाद्य साहित्याने समृद्ध संगीत कक्ष, ई-लायब्ररी व इंटरनेट वाय-फाय आदी सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात.

सन २०२४-२५ या सत्रात इयत्ता ६ वी ते १० वीमध्ये रिक्त जागेकरिता ज्या इच्छुक विद्यार्थी, विद्यार्थिनींना सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातींच्या शासकीय निवासीशाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे अशा गरजू विद्यार्थ्यांनी (मुलींकरिता) अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, वानाडोंगरी येथून व (मुलांकरिता) अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, वारेगाव येथून विनामूल्य अर्ज प्राप्त करून निर्धारित मुदतीत संपूर्ण आवश्यक कागदपत्रांसह संबंधित निवासी शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करावेत, असे जाहीर आवाहन सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नागपूर या कार्यालयाशी संपर्क करावा.

## पावसामुळे भाजीपाला महागला

**लोकशाही वार्ता/नागपूर**

मुसळधार पावसामुळे भाजीपाल्यांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला



आहे. भाज्यांचे दर शंभरीजवळ पोहोचले आहे. किरकोळ बाजारात टोमॅटो दर्जानुसार प्रति किलो शंभरीपार तर हिरवी मिरची १२० आणि कोथिंबीर १५० रुपयांवर पोहोचले आहे. कॉटन मार्केट घाऊक बाजारात टोमॅटो प्रति किलो ६० ते ७० रुपये, हिरवी मिरची ७० ते ८० आणि कोथिंबीरचे भाव ८० ते १०० रुपये दराने विक्री होत आहे. किरकोळमध्ये केवळ वांगे, पत्ता कोबी, फूल कोबी आणि पालक परवडणाऱ्या दरात आहेत. वांगे २० रुपये, पत्ता कोबी २० रुपये, फूल कोबी आणि पालकचे भाव प्रति किलो ४० रुपये आहेत. अन्य भाज्यांचे भाव प्रति किलो ८० रुपयांवर गेले आहेत.

# जिल्ह्याची कुपोषण मुक्तीच्या दिशेने वाटचाल!

## सीईओंच्या पुढाकाराने 'बाल कुपोषण मुक्त' योजना ठरतेय प्रभावी



**लोकशाही वार्ता / नागपूर**

कुपोषण मुक्तीसाठी राज्य शासनाकडून विविध प्रयत्न सुरू आहेत. त्यातच आता भर म्हणून जिल्हा परिषदेच्या सीईओ सौम्या शर्मा यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात 'बाल कुपोषण मुक्त नागपूर'ही योजना राबविण्यात येत आहे. त्याचे सकारात्मक परिणामही जिल्ह्यात दिसून येत आहे. या योजनेद्वारे कुपोषणाच्या दृष्टचक्रातील बालकांना सकस आहारासोबतच वेळोवेळी आरोग्य तपासणीच्या माध्यमातून जिल्ह्यातील अतितीव्र कुपोषित (सॅम) बालकांची संख्या खाली येत असून, जिल्हा कुपोषण मुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे चित्र आहे.

### सॅममधून आलेत मॅम श्रेणीत

या योजनेची सुरुवात मार्च २०२४ मध्ये ५५ सॅम मुलांसोबत झाली. एप्रिलच्या अखेरीस सॅम बालकांची संख्या घटून ३१ वर आली. तर २४ बालके सॅम श्रेणीतून मध्यम तीव्र कुपोषित (मॅम)श्रेणीत आले. मेमध्ये सॅम बालकांची संख्या २३ वर येऊन ३० बालके मॅम श्रेणीत आले. दोन बालकांनी सामान्य वजन गाठले. जून २०२४ मध्ये सॅम बालके १९ वर तर ३३ बालके मॅम श्रेणीत आले असून, ३ बालकांनी सामान्य वजनश्रेणी गाठली. या ५५ बालकांपैकी ११ जणांना दुर्धर आजाराने ग्रासले आहे. जूनच्या मध्यापर्यंत, पौष्टिक अन्न आणि आरोग्य तपासणीच्या माध्यमातून ११ मॅम बालकांपैकी ७ बालकांचे रुपांतर मॅम श्रेणीमध्ये आल्याचा प्रशासनाचा दावा आहे.

सौम्या शर्मा यांच्या पुढाकाराने आरोग्यम धोरण, हा एक नावीन्यपूर्ण 'कंटिन्युम ऑफ केअर' उपक्रम आरोग्य, आयसीडीएस व शिक्षण विभाग यांना एकत्र करून माता आणि बाल आरोग्य सुधारण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. ग्रामस्तरावरील समितीच्या देखरेखीखाली गरोदर/स्तनदा माता, शून्य ते ६ वर्ष वयोगटातील बालके आणि ६-१८ वयोगटातील किशोरवयीन मुलींना लाभ व्हावा, हा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला गर्भवती व स्तनदा मातांसाठी अंगणवाड्यांमध्ये आरोग्य तपासणी करण्यात येते. बालकांसाठी दर महिन्याच्या २२ तारखेला समुपदेशन सत्र व १ ते १० तारखेदरम्यान बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी मूल्यांकन व अंगणवाडी स्वच्छतेला प्राधान्य दिले जाते. तसेच कुपोषित बालकांना अतिरिक्त आहार साहाय्य केले जाते. वृद्ध, मुलांना वार्षिक आरोग्य तपासणी, डोळ्यांची तपासणी, किशोरवयीनांचे समुपदेशन आणि सहामाही बीएमआय तपासणीचा लाभ दिला जातो.



> या व्यापक आहार योजनेचे पालन करून व वैद्यकीय काळजी घेऊन सॅम श्रेणीतील बालकांच्या शारीरिक वाढीमध्ये, रोगप्रतिकारक शक्तीमध्ये आणि बौद्धिक विकासात सुधारणा झाली आहे. सोबतच त्यांच्या निरोगी आहाराच्या सवयी विकसित केल्या आणि त्यांच्या ऊर्जा पातळीत वाढ झाली. नियमित आरोग्य तपासणी आजारांचे वेळीच निदान यामुळे उपचारास मदत झाली. ज्यामुळे कुपोषणातून बरे होण्यास आणि दीर्घकालीन आरोग्य सुनिश्चित करण्यात फायदेशीर ठरले.
>
> – **सौम्या शर्मा**, सीईओ जि.प. नागपूर

जानेवारी २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत आरोग्यम धोरणाच्या नियमित पाठपुराव्याद्वारे बाल विकास प्रकल्प अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी आणि सीईओंच्या क्षेत्रभेटीमुळे सॅम बालकांमध्ये सातत्याने घट दिसून आली. जानेवारी २०२३ मध्ये जिथे १०८ 'सॅम' बालक होते. त्यामध्ये डिसेंबर२०२३ पर्यंत घट होऊन ते ७० व जानेवारी २०२४ मध्ये ६८ पर्यंत खाली आले. डीबीटीद्वारे, प्रत्येकी सॅम बालकासाठी १०० रुपये दिवसाप्रमाणे ३ हजार रुपये महिना अंगणवाडी सेविकांच्या बँक खात्यात वळती करण्यात आले आहे. या निधीमुळे अंगणवाडी सेविका आहारतज्ज्ञांनी तयार केलेले ताजे शिजवलेले, पौष्टिक जेवण तयार करून मुलांच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करतात.

## शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशाची प्रक्रिया सुरू

### क्यूआर कोड स्कॅनद्वारा ऑनलाईन अर्ज उपलब्ध

**लोकशाही वार्ता / नागपूर**

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाद्वारे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणारी शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. सामाजिक न्याय विभागांतर्गत नागपूर जिल्ह्यात शहरातील मागावर्गीय मुला/मुलींची एकूण १४ वसतिगृहे तसेच तालुका स्तरावरील मागासवर्गीय मुला/मुलींचे एकूण ११ शासकीय वसतिगृह आहेत. यात उमरेड, कुही (मुलांचे व मुलींचे), वानाडोंगरी (मुलांचे व मुलींचे), नांदा ता. कामठी (मुलांचे), पारशिवनी (मुलांचे), काटोल (मुलींचे), रामटेक (मुलीचे), कळमेश्वर (मुलींचे), सावनेर (मुलींचे) अशा एकूण २५ शासकीय वसतिगृहांद्वारे विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता मोफत प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. गरजू व पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून यासाठी अर्ज आमंत्रित करण्यात आली आहेत.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, मांग/मेहतर, भंगी, इतर मागासवर्गीय, विशेष मागासप्रवर्गासह इतर प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा आहे. सद्यस्थितीत इयत्ता आठवी व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ या सत्रासाठी वसतिगृहामध्ये रिक्त असणाऱ्या जागेवर विनामूल्य प्रवेश ऑफलाईन पद्धतीने देण्यात येत आहे. यासाठी लागणारा अर्जाचा नमुना विद्यार्थ्यांना 'क्यूआर कोड'द्वारे स्कॅन करून घेता येईल. याचबरोबर प्रत्येक वसतिगृहाच्या गृहपालाकडे अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर अर्ज आवश्यक ते कागदपत्र जोडून संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपालाकडे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित ग्रहपाल अथवा सहायक आयुक्त समाज कल्याण विभागाशी संपर्क विद्यार्थ्यांना साधता येईल. अधिक माहितीसाठी संबंधित शासकीय वसतिगृहाचे गृहपाल किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नागपूर या कार्यालयाशी संपर्क करावा, असे स्पष्ट केले आहे. शासकीय वसतिगृहात निवास व भोजनासह अंथरुण- पांघरुण, शैक्षणिक साहित्य, पुस्तके, निर्वाह भत्ता, ग्रंथालय, जिम, ई-लायब्ररी व इंटरनेट वाय-फाय आदी सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात.

## शिक्षणाधिकाऱ्यांना उशिराने आली जाग!

### बीईओंना गणवेश, शूजचा अहवाल सादर करण्याच्या सूचना

**लोकशाही वार्ता / नागपूर**

समग्र शिक्षा अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शूज-सॉक्स उपलब्ध करून देण्यात येते. नवीन शैक्षणिक सत्र सुरू होऊनही अनेक तालुक्यांमध्ये विद्यार्थ्यांना हे सर्व शैक्षणिक साहित्य उपलब्धच झाले नसल्याची माहिती आहे. परंतु ही बाब शिक्षण विभागाने गांभीर्याने घेतली नाही. विशेष म्हणजे, शिक्षणाधिकारी (ईओ) सिद्धेश्वर काळुसे यांनीही हा विषय एकदमच हलक्यात घेतला. परंतु माध्यमातून वृत्त प्रकाशित होताच त्यांनी तातडीने गुरुवार, ४ जुलैला सर्व गटशिक्षणाधिकारी (बीईओ)ची बैठक बोलावून त्यांना पाठ्यपुस्तक, गणवेश, शूज-सॉक्स संदर्भातील अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या.

जिल्हा परिषद, महापालिकेच्या शाळांतील इयत्ता १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तक व शूज-सॉक्स वाटप होते. पहिल्याच दिवशी



पाठ्यपुस्तक व शूज-सॉक्स मिळण्याचा शिक्षण विभागाचा दावा फोल ठरला आहे. तर गणवेशाचा अद्याप दूरवर पत्ता नाही. अशातच शूज-सॉक्ससाठी कोट्यवधींचा निधी जिल्हास्तरावरून तालुकास्तरावर पंधरा दिवसांपूर्वी वळता होऊनही पहिल्या दिवशी हजारो विद्यार्थ्यांना त्याचे वाटप झाले नसल्याचे वास्तव आहे. तर पाठ्यपुस्कांचीदेखील कमी जास्त अशीच परिस्थिती आहे. या सर्वांचा शिक्षण विभागाकडून अहवाल तालुकास्तरावरून मागविणे क्रमप्राप्त होते. परंतु ईओ काळुसे यांच्याकडून विद्यार्थ्यांचा विषय एकदम हलक्यात घेण्यात आला. विद्यार्थ्यांबाबत ते गंभीर नसल्याची टीका झाली होती. याबाबतचे वृत्त प्रकाशित झाल्यानंतर गुरुवार, ४ जुलै रोजी त्यांनी सर्व बीईओंची बैठक घेतली.

या बैठकीला सभापती राजकुमार कुसुंबेही उपस्थित होते. बैठकीत त्यांनी सर्व बीईओंना पाठ्यपुस्तके, गणवेश व शूज, सॉक्स संदर्भातील अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार तीन बीईओंकडून माहिती देण्यात आली असून अनेक विद्यार्थ्यांना शूज व सॉक्स मिळाले नसल्याचे त्यांच्याकडून मान्य करण्यात आले.

## मातृवंदना योजनेचे जिल्ह्यात वाजले बारा!

### लाभार्थी ३७ हजार, लाभ मिळाला केवळ २९६ जणींना

**लोकशाही वार्ता / नागपूर**

गर्भधारणेच्या काळामध्ये गर्भवती मातेला सकस आहार उपलब्ध होऊन त्यापासून जन्माला येणारे बाळही सुदृढ राहावे तसेच मातामृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन तो नियंत्रित राहावा, यासाठी राज्यात २०१७ पासून प्रधानमंत्री मातृवंदना योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत महिलांना पहिल्या बाळासाठी पाच हजार तर दुसरे अपत्य मुलगी झाल्यास सहा हजार असे अनुदान देण्यात येते. परंतु नागपूर जिल्ह्यात ३७ हजार २८२ लाभार्थी संख्या असताना केवळ २९६ लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. एकूणच जिल्ह्यात या योजनेचे बारा बाजल्याचे चित्र आहे.

ग्रामीण भागात रोजंदारीवर काम करणाऱ्या स्त्रियांना गर्भधारणा झाल्यावर त्या मजुरीवर जात नाही. यामुळे त्या काळात त्यांना सकस आहार उपलब्ध व्हावा, गर्भातील बाळाचेही पोषण व्हावे यातून जन्माला येणारे बाळ कुपोषित राहू नये म्हणून 'प्रधानमंत्री मातृवंदना योजना' सुरू केली. ही योजना राष्ट्रीय आरोग्य अभियानमार्फत राबविली जाते. केंद्र व राज्य पुरस्कृत ही सुधारित योजना आता पहिल्या अपत्यासाठी पाच हजार व दुसरे अपत्य मुलगी असल्यास सहा हजार रुपये असे अनुदान यातून मिळते. यासाठी शासनाने अधिसूचित केलेल्या संस्थेत नोंदणी करणे आवश्यक असते. लाभाची रक्कम थेट स्त्रीच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. या योजनेच्या लाभासाठी जातीची व उत्पन्नाची अट नसून, शासकीय सेवेत नसणाऱ्या सर्व महिलांना या योजनेचा लाभ मिळतो. परंतु, अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित असल्याचा मुद्दा संजय झाडे यांनी स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित करून प्रशासनाला जाब विचारला. त्यावर प्रशासनाने दिलेले उत्तरही अजब असून तेही अवाक झाले आहे.

> गर्भवती महिलांना चांगला पोषण आहार मिळावा. त्यामुळे सुदृढ बालक जन्माला यावे, यासाठी केंद्र शासनाची मातृवंदना ही चांगली योजना आहे. परंतु जि.प.च्या पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष व निष्क्रियतेमुळे अनेक लाभार्थी लाभापासून वंचित आहेत. त्यांनी यासंदर्भात आढावा घेऊन शासनाकडे निधी उपलब्धतेची मागणी करणे अपेक्षित आहे.
>
> – **संजय झाडे,** सदस्य, जि.प. नागपूर

विभागाने सांगितले की, लाभार्थी सविता नंदकिशोर शंभरकर या २०२१-२२ मधील ऑनलाईन नोंदणी केलेले लाभार्थी असून पहिला, दुसरा हप्त्याची ऑनलाईन नोंदणी ४ ऑक्टोबर २०२१ व तिसऱ्या टप्प्याची नोंदणी २६ मे २०२२ ला करण्यात आली होती. परंतु, पीएफएमएसच्या तांत्रिक अडचणींमुळे लाभ मिळालेला नाही.

३१ मार्च २०३ रोजी पीएमएमव्हीवाय १.० पोर्टल बंद झाले व पीएमएमव्हीवाय २.० पोर्टल ८ ऑगस्ट २०२३ पासून सुरू झाले. परंतु, पीएमएमव्हीवाय १.० मध्ये ऑनलाईन नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांची नावे जीओआयकडून व्हेरिफिकेशन करून फेब्रुवारीमध्ये ओल्ड केस बेनीफिशरीमध्ये अपडेट करण्यात आले. फेब्रुवारीपासून अपडेशन होत आहे. लाभार्थ्यांचे अप्रुवल व पेमेंट जनरेशन सुविधा त्या पोर्टलमध्ये नसल्याने लाभार्थ्यांचे लाभ प्रलंबित आहे. जिल्ह्यात २७ हजार २८२ लाभार्थी संख्या अपडेशनची असून २५ जून २०२४ पर्यंत केवळ ६ हजार ६६१ लाभार्थ्यांचे अपडेशन झाले. तर २९६ लाभार्थ्यांनाच लाभ मिळाला आहे.

### प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवी वापरणाऱ्यांवर कारवाई

**लोकशाही वार्ता/नागपूर**

मनपाच्या उपद्रव शोधपथकाद्वारे प्रतिबंधित प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्या धंतोली झोन अंतर्गत रिषभ धवले कॉटन मार्केट, गांधीबाग झोन अंतर्गत केशव किराणा सब्जी मंडी इतवारी, सतरंजीपुरा झोन अंतर्गत पौनीकर किराणा शॉप मस्कासाथ इतवारी आणि आशीनगर झोन अंतर्गत रवी स्वीट्स कपिलनगर या चार प्रतिष्ठानांवर कारवाई करून २० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची नोंदणी सुरू झाली आहे. नोंदणी केंद्रांवर महिलांची गर्दी पहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी केंद्र सुरू होण्याआधीच रांगा लागल्याचे दिसून येत आहे. अयोध्यानगर भागातील केंद्रांवर गुरुवारी अशी रांग पहायला मिळाली. (लोकशाही वार्ता छायाचित्रसेवा)

## अभ्यास समितीचे अध्यक्ष न्या. के. एल. वडणे विदर्भ दौऱ्यावर

**लोकशाही वार्ता / नागपूर**

गोंड गोवारी समाजाच्या निवेदनावर अभ्यास करण्यासाठी उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्या. के. एल. वडणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष न्या. वडणे हे १४ ते २० जुलै या कालावधीत विदर्भ दौऱ्यावर आहेत.

नागपूर महसूल विभागातील गोंड गोवारी समाजाचे प्रतिनिधी १५ व १६ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत लेखी निवेदन सादर करू शकतील. या वेळेत समितीपुढे संघटनेतील प्रतिनिधीला आपले म्हणणे थोडक्यात मांडण्यासाठी संधी दिली जाईल. १८ ते २० जुलै रोजी समितीचा दौरा अमरावती येथे आहे. अमरावती विभागातील संघटनेच्या प्रतिनिधींना सकाळी १० ते सायंकाळी ५ या कालावधीत नमूद तारखांना शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे आपले लेखी निवेदन सादर करता येतील. निवेदन टंकलिखित व वाचनीय असणे आवश्यक असून गोंड गोवारी संघटनेतील प्रतिनिधींना थोडक्यात आपली बाजू मांडण्यासाठी संधी देण्यात येईल.

## गर्भवती मातांच्या रक्तातील हिमोग्लोबीन पातळी वाढविण्यावर भर

### डागात एनिमिया क्लिनिक सुरू

**लोकशाही वार्ता / नागपूर**

रक्तामधील हिमोग्लोबीनच्या कमतरतेमुळे बाळंतपणादरम्यान होणारा अतिरिक्त रक्तस्त्राव हे मातामृत्यूचे सर्वात मोठे कारण असल्याचे सांगण्यात येते. या जोखीमीच्या गटातील गर्भवती मातांकरिता शहरातील डागा स्मृती स्त्री रुग्णालयात एनिमिया क्लिनिक सुरू करण्यात आले असून, या माध्यमातून दर तीन महिन्यांनी गर्भवती मातांच्या हिमोग्लोबीनचे मॉनिटरिंग करण्यात येत असून, त्यांच्या रक्तामधील हिमोग्लोबीनची पातळी वाढविण्यावर भर दिला जात आहे.

या माध्यमातून गत वर्षभरातील हायरिस्क प्रेग्नंसी असलेल्या ९३७ गरोदर मातांना आतापर्यंत आयर्न शुक्रोजचे ३७४८ डोस देण्यात आले आहेत. यापैकी एकट्या जून महिन्यात १०६ गरोदर मातांना आयर्न शुक्रोजचे ४२५ डोस देऊन त्यांच्या शरीरातील हिमोग्लोबीनची पातळी वाढविण्यात आली. त्यामुळे या जोखमीतल्या गटातील गरोदर मातांचे सुरक्षित बाळंतपण होऊ शकले.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गरोदर मातांसाठी डागा स्मृती स्त्री रुग्णालय आशेचा किरण आहे. त्यामुळे डागात दररोज किमान ४० गरोदर मातांची बाळंतपणे होतात. बाळंतपणासाठी येणाऱ्या या गरोदर मातांपैकी ५० टक्के गरोदर माता जोखमीच्या गटात असतात. एनिमियामुळे हिमोग्लोबीनची कमतरता असल्याने या गरोदर मातांना बाळंतपणादरम्यान अतिरिक्त रक्तस्त्राव होण्याची जोखीम असते. त्यामुळे अशा जोखमीच्या गटातील गरोदर मातांसाठी डागा रुग्णालयाने एनिमियामुक्त भारत अभियानांतर्गत स्वतंत्र क्लिनिक सुरू केले. यात जोखमीच्या गटातील गरोदर मातांची कलर कोडिंगद्वारे वर्गवारी केली जाते. हायरिस्क प्रेग्नंसी गटातील गरोदर मातांसाठी पिवळा, हिरवा, निळा आणि लाल अशा तीन रंगांमध्ये विभागणी केली जाते. गरोदर मातेच्या एनएससी कार्डवर ठळक हे रंग दर्शविले जातात.

थायरॉईडने ग्रस्त गरोदर मातेसाठी पिवळा, सामान्य गटातील गरोदर मातेसाठी हिरवा, हायपरटेन्स गरोदर मातेसाठी निळा आणि जोखमीच्या गटातील गरोदर मातेसाठी लाल रंगांचे मार्किंग केले जाते. गरोदरपणाचा आदर्श कालावधी ९ महिने ९ दिवस मानला जातो. त्यामुळे रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असल्याने एनिमियाग्रस्त जोखमीच्या गरोदर मातांची दर तीन महिन्यांनी हिमोग्लोबीन मॉनिटरिंग केली जाते. त्यानुसार गरोदर मातेला पहिल्या तिमाहीत आहार आणि फॉलिक एसिडच्या गोळ्या देऊन रक्तातल्या हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविण्यावर भर दिला जातो. दुसऱ्या तिमाहीत आयर्न सप्लिमेंट दिले जाते. या नंतरही हिमोग्लोबीनची पातळी वाढली नाही तर अशा गरोदर मातांना शेवटच्या तिमाहीत एक दिवसाआड आयर्न शुक्रोजचे ४ डोस दिले जातात. एक दिवसाच्या डे केअर सेंटरमध्ये ठेवून त्यांच्या बाळंपणादरम्यानची अतिरिक्त रक्तस्त्रावाची जोखीम कमी करण्यावर भर दिला जातो.

> बाळंतपणादरम्यान ऐनिमियाग्रस्त गर्भवती मातांना अतिरिक्त रक्तस्त्रावाची जोखीम असते. अशावेळी माता मृत्यू टाळण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. यामुळे बाळंपणादरम्यान दगावणाऱ्या गर्भवती मातांचे आणि गर्भातल्या बाळांचे प्राण वाचविणे शक्य झाले आहे.
>
> – **डॉ. सीमा पारवेकर**, वैद्यकीय अधीक्षक, डागा रुग्णालय

## मनपाच्या टाऊन हॉलच्या नूतनीकरणाला हेरिटेज समितीचा हिरवा कंदील

**लोकशाही वार्ता/नागपूर**

महाल येथील मनपाच्या टाऊन हॉलच्या प्रस्तावित नूतनीकरणासह राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराजबाग येथील हेरिटेज इमारतीतील दुरुस्ती, तसेच झिरो माईल आणि कस्तुरचंद पार्क येथील ऐतिहासिक वास्तूची दुरुस्ती तसेच सौंदर्यीकरणाच्या कामाला हेरिटेज संवर्धन समितीने मान्यता दिली.



गुरुवारी (ता.४) मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या नगर रचना विभागामध्ये हेरिटेज संवर्धन समितीची बैठक पार पडली. बैठकीत प्रसिद्ध वास्तूविशारद व समिती अध्यक्ष अशोक मोखा, नगर रचना विभागाचे उपसंचालक तथा सदस्य सचिव हेरिटेज समिती प्रमोद गांवडे, स्ट्रक्चरल अभियंता पी. एस. पाटणकर, नगर रचना शाखा कार्यालयाचे गु. मो. काझी, नागपूर सुधार प्रन्यासचे अनिल राठोड, प्रकल्प ३च्या कार्यकारी अभियंता अ.दी. यलचरवार, अनुप तारटेकर यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते. बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

महाल येथील नवीन टाऊन हॉल बांधकामाच्या प्रस्तावित बांधकाम नकाशानुसार परिसरातील जागेवरील हेरिटेज स्थळ म्हणून असणारी जुनी वाचनालय इमारत आणि टाऊन हॉल इमारतीमध्ये प्रस्तावित नूतनीकरण कार्याचा विषय चर्चेस ठेवण्यात आला. यात जुने हेरिटेज स्थळ कायम ठेवून परिसरात नवीन टाऊन हॉल व महानगरपालिकेच्या ऑफीसचे बांधकाम करण्याकरिता हेरिटेज संवर्धन समितीने परवानगी दिली. तसेच बांधकामादरम्यान हेरिटेज वास्तूचे महत्त्व कमी होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी सूचनादेखील देण्यात आल्या. याशिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर महाराजबाग येथील हेरीटेज इमारतीमधील कुलगुरू, कुलसचिव, मिटिंग हॉल व कार्यालयातील पाण्यामुळे खराब झालेल्या सिलिंग व भिंतीचे पॅनेलिंग दुरुस्तीच्या कामालादेखील बैठकीत परवानगी देण्यात आली.

झिरो माईल आणि कस्तुरचंद पार्क येथील ऐतिहासिक वास्तूची दुरुस्ती तसेच सौंदर्यीकरणाच्या कामाचा विषयदेखील बैठकीत मांडण्यात आला. त्यानुसार कस्तुरचंद पार्क येथील ऐतिहासिक इमारतीचे (छत्री) व या परिसराचे सौंदर्याकरण करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाला मान्यता देण्यात आली. मान्यता प्रदान करताना कामाचा अहवाल दर महिन्यात सादर करावा, अशी सूचनादेखील संबंधित विभागाला करण्यात आली. याशिवाय झिरो माईल येथील ऐतिहासिक वास्तूची पूर्ण स्थापना, दुरुस्ती तसेच सौंदर्यीकरण करण्याच्या कामालाही मान्यता देण्यात आली.